अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना
मदत देण्याबाबत...
(मार्च-२०२६)

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ७६ (भाग-८) /मदत-१(म-३ )**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १८ मे, २०२६

**वाचा :-**
१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- २०२५ /प्र.क्र. २०/म-३,दि.३०.०५.२०२५
४) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह-३/नैआ /कावि/७८/२०२६, दि. १५.०४.२०२६
५) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.मह-३/नैआ /कावि/८१/२०२६, दि. २०.०४.२०२६
६) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.मशा-७(५) /नै आ व्य/नागपूर/मार्च २६/शेतीपीक नुक. /कावि/१३६/२०२६, दिनांक २२.०४.२०२६
७) विभागीय आयुक्त, नागपूर यांचे पत्र क्र.मशा-७(५) /नै आ व्य/चंद्रपूर/मार्च २६/शेतीपीक नुक. /कावि/१४५/२०२६, दिनांक ३०.०४.२०२६
८) विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र.मशा/कार्या-६/नै. आ./माहे सुधारीत मार्च २०२६/ शे. पि. नुक./२०२६, दि. २९.०४.२०२६
९) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा. क्र. २०२६/मशाका/नैआ/कावी-४१८, दि. २७.०४.२०२६
१०) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा. क्र. २०२६/मशाका/नैआ/कावी-३५४, दि. १०.०४.२०२६
११) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचे पत्र क्र. जा. क्र. २०२६/मशाका/नैआ/कावी-४३३, दि. ०५.०५.२०२६
१२) विभागीय आयुक्त, अमरावती यांचे पत्र क्र. अआ/नैआ/महसूल/म.स./कावि/२९/२०२६, दि. २९.०४.२०२६
१३) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र. मशा/टंचाई/शेतीपीक नुकसान /ज-३/१२०२०/७१, दि. ३०.०४.२०२६

**प्रस्तावना:-**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३

अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने दि.३०.०१.२०१४ अन्वये अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधितांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, दि.२२.६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे.

२. खरीप २०२५ व या पुढील कालावधीकरीता केंद्र / राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेती पिक नुकसानीबाबत द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ प्रमाणे देय राहील, असा निर्णय दिनांक ३०.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील निकष व दर यानुसार विभागीय आयुक्त, पुणे, नागपूर, कोकण, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नाशिक यांनी संदर्भ क्र. ४ ते १३ येथील पत्रांन्वये माहे **मार्च- २०२६** या कालावधीत "अवकाळी पाऊस " यामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव सादर केला आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**शासन निर्णय :-**

माहे **मार्च- २०२६** या कालावधीत राज्यात विविध जिल्ह्यांत "अवकाळी पाऊस" यामुळे शेतीपिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता संदर्भाधीन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार रुपये १६४,८३,४४,०००/- (रूपये एकशे चौसष्ट कोटी त्र्याऐंशी लक्ष चवेचाळीस हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून अथवा आवश्यकतेनुसार पुर्नविनियोजनाव्दारे तरतुद उपलब्ध करुन घेऊन कार्यासन मदत-३ (म-११) यांनी हा निधी वितरित करावा.

३. संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथे नमूद दि.२४.०१.२०२३ अन्वये सूचित केल्यानुसार DBT पोर्टलव्दारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सोबतच्या प्रपत्रामधील सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात काळजीपूर्वक तयार करुन संबंधित अधिकाऱ्यांनी ती संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. तथापि,

अ) चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी.

ब) कोणत्याही लाभार्थ्यांना मदत देतांना व्दिरुक्ती होणार नाही याची तहसिलदार यांनी व जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घ्यावी.

४. हा निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी.

५. लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात

अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

६. सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा व उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

७. सदर शेतीपिक नुकसानीचा खर्च, मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशिर्ष २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य; (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च; (९१) (०५) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकनुकसानीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य (अनिवार्य); ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (सशर्त) (२२४५ २४५२) या लेखाशीर्षाखाली सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आर्थिक वर्ष २०२६-२७ मधून भागविण्यात यावा.

८. याबाबतची देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार व सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०५१८१७१५४४७५१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून टाकण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

SURYAWANSHI SAMPAT DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2026.05.18 17:16:57 +05'30'

**( संपत सूर्यवंशी )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
९. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
१०. अपर मुख्य सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई
११. विभागीय आयुक्त, पुणे / नागपूर / कोकण / छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/ नाशिक
१२. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे

१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१५. सर्व संबंधित जिल्हाधिकारी
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१८. सर्व संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी
१९. कार्यासन अधिकारी (मदत-३ (म-११)/मदत-१ (म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२१. निवड नस्ती (कार्यासन/ म-३ )

| शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ७६ (भाग-८ )/म-३ , दि. १८/०५/२०२६ सोबतचे विवरणपत्र | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| विभाग | जिल्हा | कालावधी | प्रस्तावाचा दिनांक | बाधित शेतकरी संख्या | बाधित क्षेत्र - हेक्टर | निधी (रू. लक्ष) |
| पुणे | सांगली | मार्च-२०२६ | १५.०४.२०२६ | ३११७ | १६७६.५६ | ३३८.९५ |
| | पुणे | मार्च-२०२६ | २०.०४.२०२६ | ८५०९ | ३९४०.३७ | ७१३.३७ |
| **पुणे विभाग एकूण** | | | | **११६२६** | **५६१६.९३** | **१०५२.३२** |
| नागपूर | नागपूर | मार्च-२०२६ | २२.०४.२०२६ | २५० | १४७.४६ | २५.६२ |
| | चंद्रपूर | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | ८४६ | ४४०.५४ | ७५.०२ |
| **नागपूर विभाग एकूण** | | | | **१०९६** | **५८८** | **१००.६४** |
| कोकण | सिंधुदुर्ग | मार्च-२०२६ | २४.०४.२०२६ | २२१ | ५०.५२ | १२.६७ |
| | रत्नागिरी | मार्च-२०२६ | २९.०४.२०२६ | १९२ | ४८.६६ | ११.४६ |
| **कोकण विभाग एकूण** | | | | **४१३** | **९९.१८** | **२४.१३** |
| छत्रपती संभाजीनगर | नांदेड | मार्च-२०२६ | २७.०४.२०२६ | ४९६ | २२४.३ | २३.६८ |
| | धाराशिव | मार्च-२०२६ | २७.०४.२०२६ | ३३१५ | १६६५.१४ | ३३९.३६ |
| | जालना | मार्च-२०२६ | १०.०४.२०२६ | २८५७ | १४९८.३० | २५२.९० |
| | लातूर | मार्च-२०२६ | ०५.०५.२०२६ | १५६ | १००.७० | २१.२५ |
| | हिंगोली | मार्च-२०२६ | ०५.०५.२०२६ | ४९८ | २६०.७८ | ४५.०३ |
| **छत्रपती संभाजीनगर विभाग एकूण** | | | | **७३२२** | **३७४९.२२** | **६८२.२२** |
| अमरावती | अमरावती | मार्च-२०२६ | २९.०४.२०२६ | ४७५ | १३५.३४ | २२.९५ |
| | यवतमाळ | मार्च-२०२६ | २९.०४.२०२६ | ७७ | ७४.४० | १२.७१ |
| | वाशिम | मार्च-२०२६ | २९.०४.२०२६ | ९ | ३.४० | ०.७७ |
| **अमरावती विभाग एकूण** | | | | **५६१** | **२१३.१४** | **३६.४३** |
| नाशिक | नाशिक | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | ६५७५६ | ४१५५६.५९ | ७३३४.९४ |
| | धुळे | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | १४२७५ | ९०७२.१५ | १५५१.५० |
| | नंदुरबार | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | ९५३ | ३७३.६७ | ६६.५७ |
| | जळगांव | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | ३७९९१ | १८२२९.७३ | ३११४.६० |
| | अहिल्यानगर | मार्च-२०२६ | ३०.०४.२०२६ | २७६०२ | १४३४९.३२ | २५२०.०९ |
| **नाशिक विभाग एकूण** | | | | **१४६५७७** | **८३५८१.४६** | **१४५८७.७०** |
| **एकूण पुणे + नागपूर विभाग + कोकण विभाग + छत्रपती संभाजीनगर विभाग + अमरावती विभाग + नाशिक विभाग** | | | | **१६७५९५** | **९३८४७.९३** | **१६४८३.४४** |

**रुपये १६४,८३,४४,०००/- (अक्षरी रूपये एकशे चौसष्ट कोटी त्र्याऐंशी लक्ष चवेचाळीस हजार फक्त)**

SURYAWANSHI
SAMPAT
DASHARATH

Digitally signed by SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department, 2.5.4.20=E2D0677DC3B9F523D6452EDD479C3B2EDC0887C9102B4130AE3EF3DD803B7322, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F8D5F07D73B60D73112565DB9BAEE680FFADE9B8758D5A695368E1D3656632DD, cn=SURYAWANSHI SAMPAT DASHARATH
Date: 2026.05.18 17:17:16 +05'30'

**(संपत सूर्यवंशी)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**